

# मराठी
# सुगमभारती
## इयत्ता सहावी



- **‘पुस्तक’ हा शब्द खालील वाक्यांमध्ये विविध रूपांत आलेला आहे. ते वाचा व समजून घ्या.**




- **पुस्तकाप्रमाणे ‘वारा’ या शब्दाची खालील वाक्यांत योग्य रूपे लिहा.**


(१) वारा जोरात वाहतो.
(२) ........... माती उडाली.
(३) ........... धूळ घरात आली.
(४) ........... कोण अडवणार!
(५) ........... वेग खूप होता.
(६) तू ........... जाऊ नको.

- **खाली खेळांच्या साहित्याची चित्रे दिलेली आहेत. त्यांचे निरीक्षण करा. त्यांबाबत थोडक्यात माहिती लिहा.**





मंजुरी क्र. : जा.क्र. मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक- ०६/०४/२०१६



## मराठी

# सुगमभारती

## इयत्ता सहावी

(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

C8UCSS

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१६
तिसरे पुनर्मुद्रण : २०१९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मुख्य समन्वयक**
श्रीमती प्राची रविंद्र साठे

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**
श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्री. समाधान शिकेतोड | श्री. मयुर लहाने | श्री. संदीप रोकडे |
| श्री. बापू शिरसाठ | प्रा. विजय राठोड | श्रीमती स्मिता गालफाडे |
| श्रीमती प्रांजली जोशी | डॉ. माधव बसवंते | डॉ. प्रमोद गारोडे |
| श्रीमती वैदेही तारे | श्री. देविदास तारू | श्रीमती दीपाली पळशीकर |

**संयोजन :**
श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार :** स्मिता क्षीरसागर
**मुखपृष्ठ :** स्मिता क्षीरसागर

**अक्षरजुळणी :**
भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :**
सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर,
निर्मिती अधिकारी

**कागद :** ७० जी. एस.एम. क्रिमव्होव
**मुद्रणादेश :** N/PB/2019-20/Qty.
**मुद्रक :**

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

## *प्रस्तावना*

**महाराष्ट्र शासनाने सन २००९** मध्ये राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. '**प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२**' मध्येही याच धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगु, सिंधी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी (संयुक्त) अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता सहावीचे मराठी सुगमभारती हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन-अध्यापन करताना स्पष्ट व्हावे, त्यासाठी या पाठ्यपुस्तकात भाषाविषयक अपेक्षित क्षमता विधानांचा समावेश करण्यात आला आहे.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्यासाठी 'खेळ खेळूया', 'सुविचार', 'वाचू आणि हसू', 'वाचा', 'घोषवाक्ये', 'ओळखा पाहू', 'शब्दकोडी' यांचा समावेश केला आहे. या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांस वाव मिळणार आहे. 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांची सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यांसाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक:** ९ मे, २०१६, अक्षय तृतीया
भारतीय सौर : १९ वैशाख १९३८

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांसः

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : संयुक्त भाषा मराठी सहावी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना -<br>➢ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृक्श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची आणि चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ आपली भाषा वाचत असताना लिहिण्यासंदर्भात क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, शब्दकोडी.<br>➢ मराठी भाषेमधील संदर्भाला अनुसरून भाषेचे विश्लेषण (व्याकरण, वाक्यरचना, विरामचिन्हे इत्यादी.) करण्याची संधी दिली जावी.<br>➢ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➢ साहित्य आणि साहित्यिक तत्त्वांची समज वाढण्याची संधी दिली जावी.<br>➢ शब्दकोशाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>➢ भाषा समृद्धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या व्यक्ती यांबाबत विचार मांडण्याची संधी दिली जावी. | 06.LA.01 पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा., स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात.<br>06.LA.02 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात.<br>06.LA.03 रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वत:च्या शब्दांत मांडतात. तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.<br>06.LA.04 इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात, सांगतात. उदा., बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी.<br>06.LA.05 विविध विषयांसाठी, विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.<br>06.LA.06 वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.<br>06.LA.07 पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इत्यादी.) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात. त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.<br>06.LA.08 कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.<br>06.LA.09 वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.<br>06.LA.10 सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.<br>06.LA.11 घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकतात.<br>06.LA.12 मोठ्या माणसांच्या संवादात, मित्रांच्या गटचर्चेत सहभागी होऊन आपले मत सुस्पष्टपणे मांडतात.<br>06.LA.13 दिलेल्या शब्दांचा, शब्दसमूहांचा, म्हणी व वाक्प्रचारांचा जीवनव्यवहारात उपयोग करतात, त्यांचा संग्रह करतात.<br>06.LA.14 योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात.<br>06.LA.15 विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.<br>06.LA.16 लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.<br>06.LA.17 परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br>06.LA.18 चित्रवर्णन स्वत:च्या शब्दांत लिहितात.<br>06.LA.19 सुविचार, संदेश, कथा परिपाठात सादर करतात.<br>06.LA.20 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. उदा. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, लिंग, वचन, शुद्धलेखनाचे नियम.<br>06.LA.21 शब्दकोश अकारविल्ह्यानुसार पाहतात. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | नव्या युगाचे गाणे (गाणे) | शुभदा दादरकर | १ |
| २. | अन् दयाळ वाचला | डॉ. सतीश पांडे | २ |
| ३. | कळो निसर्ग मानवा (कविता) | सचिन बेंडभर | ५ |
| ४. | दोन भाऊ (चित्रकथा) | घनश्याम देशमुख | ९ |
| ५. | मला वाटते (कविता) | मधुकर बारस्कर | १२ |
| ६. | भांडण चवींचे | हेमलता परदेशी | १४ |
| ७. | चंद्रावर मी गेलो तेव्हा... (कविता) | राजन साटम | १८ |
| ८. | अपार प्रेम | शुभदा सुरंगे | २१ |
| ९. | चला पुढे! चला पुढे! | डॉ. इंदुमती अरकडी | २४ |
| १०. | छोटीशी बी (कविता) | माया धुप्पड | २९ |
| ११. | वाईटातून चांगले | सुभाषचंद्र वैष्णव | ३२ |
| १२. | शाळा नको आताच सुटायला (कविता) | ज्योती कदम | ३५ |

# १. नव्या युगाचे गाणे

C948UF

● **ऐका. म्हणा. वाचा.**

नव्या युगाचे नवीन गाणे,
एक दिलाने गाऊ
मानवतेचा दीप अंतरी नित तेवत ठेवू ।।धृ।।



अज्ञानाचा तिमिर सारुनी
तेजोमय हा सूर्य उगवला
विज्ञानाच्या नभोमंडळी आपण तारे होऊ ।।१।।

रंग आपुला वेगवेगळा
सूर आपुला एकसारखा
अनेकतेतून एकत्वाचे गाणे आपण गाऊ ।।२।।



हातामध्ये हात गुंफुनी
देशहिताचे मंत्र जपोनी
हासत-खेळत ध्येयमंदिरी पुढे पुढे जाऊ ।।३।।

भारतभूची पवित्र माती
प्रिय आम्हाला स्वर्गाहुनही
या धरणीचे रक्षण करण्या प्राण पणाला लावू ।।४।।

**- शुभदा दादरकर**

● **वाचा.**

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवीत !

**-वि. म. कुलकर्णी**


लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी

**- सुरेश भट**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून गटात तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात साभिनय म्हणून घ्यावे. विद्यार्थ्यांना गाणे, कविता, समूहगीते यांच्या ध्वनिफिती ऐकवाव्या.

# २. अन् दयाळ वाचला

दुपारी तीनचा सुमार. रस्त्यावर वर्दळ नव्हती. मी स्कूटरवरून दवाखान्याकडे निघालो होतो. मला ओलांडून एक स्कूटर भरधाव वेगाने पुढे गेली. त्याचवेळी रस्त्याच्या डाव्या बाजूने एक दयाळ पक्षी उडत आला आणि नेमका त्या स्कूटरला धडकला.



तापलेल्या डांबरी रस्त्यावर मधोमध क्षणात कोसळला. मला वाटले खेळ खलास. मी थांबलो. समोर पाहिले, दयाळ निपचित पडलेला होता.

शेजारच्याच बसथांब्यावरील काही माणसे रस्त्यावर पडलेल्या दयाळ पक्ष्याकडे त्रयस्थपणे पाहत उभी होती. त्या माणसांची आणि माझीही थंड अलिप्तता पाहून मला स्वत:चीच शरम वाटली. आणखी काही दयाळ रस्त्यावर उतरलेले होते. तीन कावळे तारेवर बसले होते, पडलेल्या त्या दयाळाचा जणू फडशा पाडण्यासाठीच. ज्या अर्थी कावळ्यांनी अजून दयाळाला उचलले नव्हते, त्या अर्थी दयाळ खरेच मेला आहे किंवा कसे हे पाहण्याची संधी होती. मी दयाळाजवळ गेलो व त्याला हातात घेतले आणि अहो, काय आश्चर्य! दयाळाने हळूच चोच हालवली. मी त्याला रुमालात गुंडाळून माझ्या स्कूटरच्या डिकीत ठेवले आणि दवाखान्यात घेऊन आलो. त्याला चोचीतून औषध पाजले आणि एका छिद्रे असलेल्या हवेशीर पुठ्ठ्याच्या डब्यात ठेवले.

सुमारे दोन तासांनी माझे काम संपले. डब्यात डोकावून पाहिले, तर मला दयाळ पक्षी उभा राहिलेला दिसला. मग मी त्याला घरी घेऊन आलो. रात्री त्याला ग्लुकोजचे पाणी पाजले आणि फळाचा गर खाऊ घातला. रात्रभर दयाळाला छिद्रे पाडलेल्या डब्यातच एका सुरक्षित जागी ठेवले.

सकाळी माझी चाहूल लागताच डब्यातून दयाळाच्या पंखांच्या फडफडाटाचा आवाज कानावर आला. तो आवाज ऐकून मला किती बरे वाटले म्हणून सांगू! खरे तर दयाळाला निसर्गाने मधुर आवाजाची देणगी बहाल केली आहे; पण काल दुपारपासून दयाळ पक्ष्याने एकही लकेर गायली नव्हती.



**शिक्षकांसाठी :** वरील कथेतील प्रसंगासारख्या एखाद्या प्रसंगावर विद्यार्थ्यांना गटात चर्चा करायला लावावी. त्यांना आपले अनुभव सांगण्यासाठी प्रवृत्त करावे.

दयाळाला हातात घेतल्यावर मला त्याच्या पंखांमध्ये ताकद आल्याची खात्री झाली. दयाळाच्या काळ्या-जांभळ्या पंखांवर तेज आले होते. पांढरे पोट स्वच्छ दिसत होते. डोळ्यांत चमक होती. तो मान हालवून कानोसा घेत होता. तो उडून जायला तयार होता. मी दयाळाला अलगद ओंजळीत धरून गच्चीवर आणले. हलकेच ओंजळ उघडली. दयाळ पक्षी सहजपणे उडून समोरच्या शिरीषाच्या झाडावर बसला. जणू त्याला काहीच इजा झाली नव्हती. मग निळ्या आकाशाकडे पाहून दयाळ पक्ष्याने कितीतरी वेळ शिरीषाच्या झाडावर बसून सुरेल गीत आळवले. शुश्रूषा केल्याचे इतके बहुमोल पारितोषिक क्वचितच कोणास प्राप्त झाले असेल!

**– डॉ. सतीश पांडे**

**शब्दार्थ :** **वर्दळ** – रहदारी. **निपचित** – हालचाल न करणे. **शरम वाटणे** – लाज वाटणे. **फडशा पाडणे** – संपवणे, फस्त करणे. **चाहूल लागणे** – समजणे,जाणीव होणे. **बहाल करणे** – मोठ्या मनाने देणे. **कानोसा घेणे** – अंदाज घेणे. **सुरेल** – गोड आवाज. **आळवणे** – पुन्हा पुन्हा म्हणणे. **शुश्रूषा** – सेवा. **बहुमोल** – खूप मूल्य असलेले.

## स्वाध्याय



**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लेखक स्कूटरने कोठे निघाले होते?
(आ) रस्त्याने जाताना कोणती घटना घडली?
(इ) माणसे दयाळ पक्ष्याकडे कोणत्या भावनेने पाहत होती?
(ई) तीन कावळे तारेवर कशासाठी बसले होते?
(उ) लेखकाने दयाळला कोठे नेले?
(ऊ) निसर्गाने दयाळला कोणती देणगी बहाल केली आहे?
(ए) दयाळ उडून कोणत्या झाडावर बसला?

**प्र. २. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) वर्दळ (आ) मधुर (इ) पक्षी (ई) आकाश (उ) झाड

**प्र. ३. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) भरधाव × (आ) स्वच्छ × (इ) सुरक्षित × (ई) मधुर ×

**प्र. ४. खालील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

(अ) पक्षी/प्राणी जखमी झालेला आढळला.
(आ) दारात कुत्रा थंडीने कुडकुडत आहे.
(इ) एखाद्या वृद्धाला रस्ता ओलांडायचा आहे.

**प्र. ५. खालील शब्दसमूह वाचा. योग्य शब्दसमूह वापरून खालील वाक्ये पुन्हा लिहा.**

(निपचित पडणे, चाहूल लागणे, त्रयस्थपणे वागणे, कानावर येणे, कानोसा घेणे, फडशा पाडणे.)

(अ) कुत्र्याच्या पिलाचा मोडलेला पाय बांधून आणल्यावर तो ............ पडला होता.
(आ) माझा जिवलग मित्र; पण तो सहलीमध्ये माझ्याशी ............ वागत होता.
(इ) गुरुजींनी सांगितलेल्या कामाचा आम्ही ............ पाडला.
(ई) दंगामस्ती करत असलेली मुले शिक्षिका येण्याची ............ लागताच चूप झाली.

(उ) रस्त्यावरील अपघाताची बातमी ………… येताच माणसांचा लोंढा त्या दिशेने जाऊ लागला.

(ऊ) गवतातून जाताना आवाज झाल्याने मी ………… घेत चालत होतो.

**प्र. ६. दयाळ पक्ष्याला सुरेल आवाजाची देणगी लाभली आहे, तसे खालील पक्ष्यांना कशाची देणगी लाभली आहे? शिक्षकांच्या मदतीने माहिती करून घ्या. लिहा.**

(१) मोर (२) पोपट (३) गरुड (४) हंस

**प्र. ७. मुक्या प्राण्यांविषयीचे अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ८. लेखकाच्या हातातून उडून दयाळ शिरीषाच्या झाडावर बसला, तेव्हा त्याच्या मनात लेखकाबद्दल कोणते विचार आले असतील ते कल्पना करून सांगा.**

**उपक्रम :** (अ) वेगवेगळ्या पक्ष्यांवरील कविता शोधा व वर्गात म्हणून दाखवा.

(आ) वेगवेगळे पक्षी, प्राणी वेगवेगळ्या कारणांसाठी एकमेकांशी संवाद साधतात. संवाद साधण्यासाठी ते काय काय करतात याचे निरीक्षण करा. तुम्ही केलेले निरीक्षण वर्गात सांगा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील रकाने वाचा व शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| व्यक्ती | पदार्थ/वस्तू/ठिकाण/वाहन | गुण, भाव |
|---|---|---|
| काका, सोनाली, आजी, माई | घर, बस, रेल्वे, मुंबई, चमचा, पुस्तक, मिठाई | नम्रपणा, चपळता, गोडवा, कष्टाळू, नवलाई, गरिबी |

**वरील रकान्यांतील सर्व शब्द नामे आहेत. व्यक्ती, वस्तू, पदार्थ, गुण, भाव यांच्या नावांना ‘नाम’ असे म्हणतात.**

- **खालील वाक्यांतील ‘नामे’ ओळखा. त्यांखाली रेघ ओढा.**

(अ) आजी, मंजू कुठे गेली?

(आ) दिनेशमध्ये प्रामाणिकपणा आहे.

(इ) वृद्धांना नेहमी मदत करावी.

(ई) दारावरची बेल वाजली.

- **खालील वाक्यांत योग्य नामे लिहा.**

(अ) ………… माझा जिवलग मित्र आहे.

(आ) माझ्या दप्तरात …………, …………, ………… या वस्तू आहेत.

(इ) ………… मधून बाहेर थुंकू नये.

C9D4H3

- **वाचा.**

**घेऊ काळजी पशू आणि पक्ष्यांची,**
**जाणीव ठेवूया पर्यावरण समतोलाची.**

**दाणे देऊ, पाणी ठेवू, काळजी घेऊ पक्ष्यांची,**
**झाडे लावू, झाडे वाढवू, सोय होईल निवाऱ्याची.**

# ३. कळो निसर्ग मानवा



- **ऐका. म्हणा. वाचा.**

येता पावसाची सर
चिंब होतेय धरणी,
परी सतावित चिंता
तरी मिळेल का पाणी.

स्वच्छ सुंदर धरती
राखायची जो-तो म्हणे,
परि ज्याला-त्याला वाटे
नेम पाळावे पराने.



नदीकाठी धरतीवर
जेथे पाहू तेथे घाण,
पर्यावरणाचे कोणा
कसे असू नये भान.

म्हणे साधला विकास
सुरू केले कारखाने,
नाही फिकीर, सोडली
पाण्यामध्ये रसायने.

पिण्यासाठी शुद्ध पाणी
साऱ्या भूमिवर असावे,
कळो निसर्ग मानवा
दिस सोनियाचे यावे.

**– सचिन बेंडभर**



**शब्दार्थ : चिंब होणे** – ओले होणे. **सताविणे** – त्रास देणे. **चिंता**– काळजी. **नेम** – नियम. **पराने** – दुसऱ्याने. **भान** – विचार, जाणीव. **फिकीर** – काळजी. **सोनियाचे दिस** – चांगले, भरभराटीचे दिवस.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरात आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्या.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पावसाची सर आली तरी कवीला कोणती चिंता सतावते?

(आ) नियम कोणी पाळावेत असे प्रत्येक माणसाला वाटते?

(इ) विकास साधताना माणसाने कोणती काळजी घेतली नाही?

(ई) नदीकाठची घाण बघून कवीच्या काय लक्षात येते?

**प्र. २. योग्य पर्याय निवडा.**

(१) पिण्यासाठी शुद्ध पाणी साऱ्या भूमीवर असावे -

- (अ) सगळ्यांनी नळाचे पाणी प्यावे.
- (आ) सगळ्यांनी फिल्टरचे पाणी प्यावे.
- (इ) सगळ्यांना पिण्यासाठी शुद्ध व स्वच्छ पाणी मिळावे.

(२) कळो निसर्ग मानवा -

- (अ) मानवाला निसर्ग दिसावा.
- (आ) मानवाला निसर्ग समजावा.
- (इ) मानवाने निसर्गाचे उपकार समजून त्याप्रमाणे वागावे.

**प्र. ३. कवितेत शेवटचे अक्षर सारखे असणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

उदा., धरणी - पाणी

**प्र. ४. खालील ठिकाणी कोणते नियम पाळावे असे तुम्हांला वाटते ?**

(अ) बसस्थानक (आ) रस्त्यावरचा सिग्नल (इ) वर्गातून मैदानावर जाताना

**प्र. ५. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

उदा., रसायने - रसा, साय, सार, साने

(अ) पर्यावरण (आ) विकास (इ) राखायचा

**प्र. ६. खालील मुद्द्यांची मित्रांबरोबर चर्चा करा. शिक्षकांच्या मदतीने आणखी माहिती मिळवा.**

पाण्याचे प्रदूषण

- होणारे अपाय
- कारणे
- त्यावर उपाय

**प्र. ७. दैनंदिन जीवनात पाण्याचा उपयोग कशाकशासाठी होतो ते सांगा.**

**प्र. ८. पाण्याचा योग्य वापर कसा करावा यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?**

**उपक्रम :**

(१) तुमच्या परिसरातील रहिवासी पाणी कशाकशामध्ये साठवतात, ते पाणी किती दिवस ठेवतात, त्या पाण्याचा वापर कसा करतात यांविषयीची माहिती मिळवा व वहीत नोंद करा.

(२) पाणी काटकसरीने वापरावे या संदर्भातील खालील घोषवाक्ये वाचा. वहीत लिहा. किमान दोन घोषवाक्ये तयार करा.

**पाणी बचतीचे नियम पाळा, पाण्याचा गैरवापर टाळा.**

**थेंब थेंब पाण्याचा, अनमोल ठेवा निसर्गाचा.**

**थेंबे थेंबे तळे साचे, महत्त्व ओळखा पाण्याचे.**

## खेळ खेळूया.

- **दिलेल्या आकृतीमध्ये योग्य शब्द लिहून शब्द डोंगर तयार करा.**


(१) स्वतःसाठी वापरला जाणारा शब्द.

(२) दररोज सकाळी पूर्वेस उगवणारा.

(३) आपण ज्या देशात राहतो तो देश.

(४) आपण आजारी पडल्यास या ठिकाणी जातो.

(५) पक्ष्यांच्या पंखांचा आवाज.



## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेद वाचा.**

आईने राजूकडे पाहिले. राजू गाढ झोपला होता. आईला राजू कधी उठतो असे झाले होते. तेवढ्यात ताई आली. ताईने राजूला उठवले.

वरील परिच्छेदात आई, राजू, ताई हे शब्द वारंवार आले आहेत. या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला परिच्छेद वाचा.

आईने राजूकडे पाहिले. तो गाढ झोपला होता. तिला तो कधी उठतो असे झाले होते. तेवढ्यात ताई आली. तिने त्याला उठवले.

आई, राजू, ताई या नामांऐवजी आपण येथे तो, तिला, तिने, त्याला असे शब्द वापरले आहेत. या शब्दांना सर्वनाम म्हणतात.

**मी, आम्ही, तू, तुम्ही, आपण, तो, त्याचा, त्याला, त्याने, आमचा, ते, त्या, तिची ही सर्वनामे आहेत.**

## • ऐका व समजून घ्या.

(बाबा मीनाला सायकलवर शाळेत सोडवायला निघाले होते. रस्त्याने जाणाऱ्या आजोबांची पिशवी हातातून निसटली अन् पिशवीतील सामान विखुरले. बाबांनी सायकल थांबवली. ते आजोबांजवळ गेले. मीना दोघांचे संभाषण ऐकत तिथेच उभी राहिली.)

बाबा : आजोबा, कशी काय पिशवी निसटली?
आजोबा : अहो, पिशवीचा बंद अचानक तुटला.
बाबा : अरे, अरे! थांबा, मी तुम्हांला सामान गोळा करू लागतो.
आजोबा : राहू दे. तुम्हांला जायला उशीर होईल.
बाबा : मीना, तू पण ये. अगं, वृद्ध माणसांना मदत करावी.
मीना : हो, हो. मी पण सामान गोळा करू लागते, म्हणजे आपल्याला उशीर होणार नाही.
बाबा : आजोबा केवढी जड ही पिशवी?
मीना : तुम्ही एकटे एवढी जड पिशवी कशी नेणार घरापर्यंत आणि तेही चालत चालत!
बाबा : आजोबा तुम्ही इथेच सावलीत थांबा. मी मीनाला सोडून लगेच येतो. तुम्हांलाही घरापर्यंत सोडतो.
आजोबा : कशाला उगाच तुम्हांला त्रास. मी जाईन.
बाबा : घरात दुसरे कोणी नाही का आजोबा सामान आणण्यासाठी?
आजोबा : आता घरात कोणीच नाही. सगळे कामाला गेले आहेत.
बाबा : ठीक आहे. थांबा इथे. मी आलोच.

## • वाचा

लहान मुले भिंगातून उन्हाची किरणे कागदावर पाडतात अन् कागद पेटवतात. आगकाडीचा वापर न करता पेटलेला कागद दाखवत 'जादू, जादू' म्हणतात. खरं तर ही जादू वगैरे काही नसते. सूर्यापासून खूप उष्णता पृथ्वीवर येते. ती किरणांच्या रूपात विखुरलेली असते. ती उष्णता भिंगातून एकवटून कागद पेटतो.

सूर्यापासून मिळणारी ही प्रचंड उष्णता आपण वाया घालवत आहोत. ही वाया जाणारी उष्णता साठवून एक शक्ती निर्माण होते. सूर्याच्या या शक्तीला सौरऊर्जा म्हणतात. या सौरऊर्जेवर रस्त्यावरचे दिवे, रेडिओ, संगणक, दूरदर्शन ही यंत्रे चालू शकतात. प्रवासाची वाहनेदेखील या ऊर्जेवर पुढे जाऊ शकतात. सौरचूल, सौरबंब एवढेच नाही, तर विहिरीवरील पाण्याचे पंपदेखील या ऊर्जेवर कार्य करू शकतात.

आहे की नाही सूर्य आपला मित्र!

**शिक्षकांसाठी :** वरील प्रसंगाचे प्रकट वाचन करावे. घरी व परिसरात घडणाऱ्या अशा प्रसंगांवर विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, संवाद साधावा. त्यांना असे प्रसंग सांगण्यास व सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ४. दोन भाऊ

१




एका शेतकऱ्याला दोन मुले होती. शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर दोघांनी जमीन वाटून घेतली व ते दोघे वेगवेगळे राहू लागले. ते जरी वेगळे झाले, तरी त्यांचे एकमेकांवर फार प्रेम होते.

२



शेतातील धान्याची मळणी झाल्यावर दोघांनी धान्य पोत्यांमध्ये भरून वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले. दुपारी मोठा भाऊ शेतात आला.

३



यंदा चांगले पीक झाले. त्याच्या मनात विचार आला, 'धाकट्याचं अजून लग्न झालं नाही. शेतीचे सर्व श्रम एकट्यालाच करावे लागतात. तेव्हा त्याला आपल्या वाट्यातून काहीतरी दिले पाहिजे.'


४



असा विचार करून मोठ्या भावाने आपल्या वाटणीच्या पोत्यांमधून पाच पोती छोट्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवून दिली.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी. या गोष्टीचे कथाकथन तसेच सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या चित्रकथांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक वाचन करून घ्यावे.

५



सायंकाळी राखणदारी करायला छोटा भाऊ खळ्यावर आला. त्याच्या मनात विचार आला, ‘इतके धान्य आपल्याला कशाला हवे ? दादाला मुलंबाळं आहेत. मी एकटाच आहे. मला कमी धान्य मिळाले तरी चालेल; पण दादाला याची आवश्यकता आहे.’

६




असा विचार करून छोट्या भावाने आपल्या वाटणीच्या पोत्यांमधून पाच पोती मोठ्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवून दिली.

७



दुसऱ्या दिवशी खळ्यावर जाऊन दोघेही पाहतात, तो दोघांची पोती पूर्वीइतकीच. माझी पोती पूर्वीइतकीच वाढली कशी? त्यांच्या मनाला प्रश्न पडला.

८



नंतर दोघांनी एकमेकांकडे चौकशी केली. खरी हकिकत समजताच दोघांनाही गहिवरून आले.

९



तेव्हापासून ते दोघे एकत्र राहू लागले. त्यांचे एकमेकांवरील प्रेम पाहून लोक त्यांच्या बंधुप्रेमाची वाहवा करू लागले.

**– घनश्याम देशमुख**

**शब्दार्थ : वाटा** – हिस्सा. **राखणदारी करणे** – राखण करणे, सांभाळणे. **गहिवरून येणे** – कंठ दाटून येणे. **वाहवा करणे** – शाबासकी देणे, स्तुती करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. मोठ्या भावाने आपल्या वाटणीतील पाच पोती छोट्या भावाला का दिली?**

**प्र. २. छोट्या भावाने आपल्याकडील धान्याची पाच पोती मोठ्या भावाला का दिली?**

**प्र. ३. खालील घटना क्रमाने लिहा.**

(१) छोट्या भावाने पाच पोती मोठ्या भावाच्या पोत्याच्या थप्पीत ठेवली.
(२) दुपारी मोठा भाऊ शेतात आला.
(३) ते दोघे एकत्र राहू लागले.
(४) शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर दोघांनी जमीन वाटून घेतली.
(५) मोठ्या भावाने पाच पोती छोट्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवली.
(६) लोक त्यांच्या बंधुप्रेमाची वाहवा करू लागले.
(७) सायंकाळी राखणदारी करायला छोटा भाऊ खळ्यावर आला.

CL19EA

**उपक्रम :** 'दोन भाऊ' ही कथा बंधुप्रेमावर आधारित आहे. मित्रप्रेम व देशप्रेम यांवर आधारित कथा मिळवा. वाचा व वर्गात सांगा. वाचलेल्या कथांमधील आवडलेली वाक्ये लिहा.

**प्रकल्प :** वर्तमानपत्रे, मासिके यांमधून चित्रमय गोष्टींचा संग्रह करा. त्या गोष्टींची चिकटवही बनवा. अशा गोष्टी परिपाठात सांगा.

- **वाचा**

**पुढील घटना वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांवर चर्चा करा.**

राजूला फुलांची खूप आवड होती. त्याच्या आईबाबांनी घरी सुंदर बाग लावलेली होती. एक दिवस बागेत रोपे लावताना राजू आईला म्हणाला, ''आई मी पण रोपे लावू?'' आई म्हणाली, ''तू जमवलेले रिकामे डबे घे आणि त्यात रोपे लाव.'' राजूने रोपे लावली. रोज रोपांना पाणी घालू लागला. बघता बघता रोपांना आकर्षक व सुवासिक फुले लागली. राजू मनातून आनंदला.

एके दिवशी आई व राजू बागेत काम करीत असताना अमेयने राजूला आवाज दिला, ''अरे राजू! चलतोस ना विजयच्या वाढदिवसाला ?'' ''होय! होय! आलोच,'' राजू म्हणाला. राजू तयार होऊन वाढदिवसाला जायला निघाला. आईला म्हणाला, ''आई मी विजयच्या वाढदिवसाला भेटवस्तू काय देऊ ?'' ती म्हणाली, तू लावलेले रोप विजयला दे. त्याला फुले खूप आवडतात.'' राजूची भेटवस्तू बघून विजयच्या आईने राजूची पाठ थोपटली.

- **विचार करून सांगा.**

(१) राजूने विजयला दिलेली भेटवस्तू तुम्हांला आवडली का? का आवडली?
(२) तुम्हांला मित्रांच्या वाढदिवसाला कोणत्या भेटवस्तू द्यायला आवडतील?
(३) तुम्ही आईबरोबर कोणकोणती कामे करता?

# ५. मला वाटते

CLA5FX

- ऐका. म्हणा. वाचा.



मला वाटते झरा होउनी
तृषा हरावी वाटसरूंची
मला वाटते मेघ होउनी
वृष्टि करावी जलधारांची. ।।१।।

मला वाटते तरुवर होउनी
फळे गोड सगळ्यांना द्यावी
सदैव शीतल छाया धरुनी
वाटसरूंची सोय करावी. ।।२।।



मला वाटते गवत होउनी
पुष्ट करावे गाइगुरांना
आणि वाटते दिवा होउनी
उजेड द्यावा मी सकलांना. ।।३।।

मला वाटते फूल होउनी
डोलावे मी तरुवेलींवर
हासत हासत सुगंध उधळत
सुखवावे सकलांचे अंतर. ।।४।।

**– मधुकर बारस्कर**

**शब्दार्थ :** **तृषा हरणे–** तहान भागणे. **वाटसरू–** पथिक, वाटेने जाणारा. **वृष्टी–** पाऊस. **पुष्ट–** बळकट. **उधळत–** पसरवत. **सुखावणे–** आनंद देणे. **अंतर–** मन.

## स्वाध्याय

**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीला झरा आणि ढग का बनावेसे वाटते ?

(आ) कवीला झाड बनून वाटसरूंची कोणती सोय करायची आहे ?

(इ) गाईगुरांना पुष्ट करण्यासाठी कवी कोण बनणार आहे ?

(ई) कवी दिवा बनून कोणते कार्य करू इच्छितात ?

(उ) फूल बनून कवी दुसऱ्यांना कशी मदत करणार आहे ?

**प्र. २. कवितेत शेवटचे अक्षर सारखे असणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

**प्र. ३. कंसात दिलेल्या शब्दांपैकी दोन-दोन समानार्थी शब्द यादीतून शोधून लिहा.**

(घन, वर्षा, पथिक, पाऊस, तरू, पुष्प, पांथस्थ, सुमन, झाड, ढग)

मेघ     वृष्टी     वाटसरू     फूल     वृक्ष

**प्र. ४. कवीला कोण कोण बनावेसे वाटते आणि काय काय करावेसे वाटते ते 'अ' व 'ब' गटात दिले आहे. त्याच्या योग्य जोड्या लावा.**

| **कोण बनावेसे वाटते.**<br>**'अ' गट** | **काय काय करावेसे वाटते.**<br>**'ब' गट** |
| --- | --- |
| (१) झरा- | फळे व सावली द्यावी. |
| (२) मेघ- | सगळ्यांना सुगंध द्यावा. |
| (३) तरू- | तहान भागवावी. |
| (४) गवत- | गाईगुरांना चारा द्यावा. |
| (५) दिवा- | सगळ्यांना प्रकाश द्यावा. |
| (६) फूल- | पाऊस पाडावा. |

**प्र. ५. परोपकारी गोष्टी/वस्तू आणि व्यक्ती यांचे वर्गीकरण करा व लिहा.**

(दिवा, समाजसेवक, वृक्ष, क्रांतिकारक, ढग, सैनिक, नदी, डॉक्टर)

| परोपकारी गोष्टी/वस्तू | परोपकारी व्यक्ती |
| --- | --- |
| | |

**प्र. ६. 'मी वारा झालो तर...!' काय काय करेन ते चार-पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ७. 'गाईगुरे' या जोडशब्दात गाई व गुरे असे दोन समान अर्थाचे शब्द आहेत. असे दोन्ही अर्थपूर्ण शब्द असलेले जोडशब्द वाचा व त्यांचा अर्थ समजून घ्या.**

**कागदपत्र, कामकाज, बाडबिस्तरा, कपडालत्ता, धनदौलत, थट्टामस्करी, दंगामस्ती, मेवामिठाई, बाजारहाट, अक्कलहुशारी, दागदागिने, नोकरचाकर.**

**उपक्रम :**

(१) पावसाळ्यात येणाऱ्या ढगांचे निरीक्षण करा. त्यांचे आकार, रंग, आवाज यांबाबत माहिती लिहा.

(२) एखादा वाटसरू तुमच्या घरी पाणी मागायला आला, तर तुम्ही त्याच्याशी काय संवाद कराल ते पाच-सात ओळींत लिहा.

# ६. भांडण चवींचे

आताच सर्व सण झाले होते. सणाच्या निमित्ताने सर्वजण एकत्र आले होते. प्रत्येकजण स्वतःचा मोठेपणा सांगत आपसात भांडत होते. गोड चव अर्थात साखर म्हणाली,''आम्हांला किती तो मान! सर्वांत पुढे मीच महान! प्रत्येक ठिकाणी माझाच उपयोग.''

तेवढ्यात चिंच म्हणाली, ''वा गं वा ! काय हिचा तोरा! अगं, पण माझं नाव काढताच तोंडाला पाणी सुटतं. तुझं आहे का तसं?'' असे म्हणताच मिरची नाचत पुढे आली आणि म्हणाली, ''अगं, ए वाकडीतिकडी! बस ना आता खाली! इथं साखरेचं अन् चिंचेचं चाललंय काय? मी काय शोभेला आले का इथे? प्रत्येक घराघरांत मिरवते मी.''

तेवढ्यात कोपऱ्यात बसलेले कारले रागातच पुढे आले आणि म्हणाले, ''काय पण मिरचे लागली बडबडायला. आम्हीपण आहोत, आमचाही उपयोग काय कमी नाही. आमच्याशिवाय औषधच उणे, तरीही पडतेच ना खाणे! बोला, आता बोला. का बसल्या गप्प?'' कारले तावातावाने बोलत होते.

मिठाला काही राहवले नाही. ते म्हणाले, ''अरे, खूप गोड खाल्लं तर रोग होतो असं म्हणतात आणि गोड गोड काय खाता? अन् चिंचे, तुला खाऊन तर खोकलाच होतो अन् मार बसतो. काय ग ए मिरचे! तू तर नाचत आलीस, तुलाही जास्त खाऊ नये म्हणून बजावतातच ना? तूपण काही कमी नाहीस. रोग होतो तुलाही खाऊन खूप, मग बस ना आता चूप?'' मीठ एकेकाला चांगले खडसावत होते. मीठ पुन्हा कारल्याकडे वळले व म्हणाले, ''वा रे वा कारल्या ! म्हणे आमचंच महत्त्व फार! अरे, तुला कोणी खाईल का? मी तर गोड सोडून सर्व पदार्थांत हवाहवासा वाटतो. माझ्यामुळे पदार्थाला चव येते. नाहीतर जेवण ते रुचकर कसले?''

आता सर्वांनाच राग आला होता. सर्वजण एकमेकांशी भांडू लागले. आवाज कोठून येतोय हे पाहायला म्हणून तोंडातील जीभताई वळवळत ऐटीत येत होत्या. सगळे तिच्याकडे पाहू लागले.



मग जीभताई म्हणाल्या, ''काय गोंधळ चाललाय? मी मोठी, मी मोठा! काय गं ए साखरे, तू मोठी! आणि ही चिंच, तू स्वतःला मोठी समजतेस आणि मिरचीताई, कारलेराव, मीठबाबा बोला आता!''

सगळे माना खाली घालून गप्प बसले. मग जीभताई म्हणाल्या, ''अरे, तुम्ही तुमचंच पाहिलं; पण मला विसरले कसे? आणि मीच नसेन तर कुठली गोड, कुठली आंबट, तिखट, कडू आणि खारट! बोला, बोला. मघाशी कसे भांडत होतात? नाहीतर मी असंच करते, निघून जाते कायमची, मग बघा!'' तेवढ्यात नम्रतेच्या सुरात साखर म्हणाली, ''जीभताई, नका ना जाऊ.'' मग तिच्या सुरात सूर मिसळून सगळेच म्हणाले, ''आमची चूक आम्हांला कळली. तुम्ही नका जाऊ! नाहीतर आम्हांला कोण विचारणार?''

शांततेत जीभताई म्हणाल्या, ''अरे, इथं कोण लहान नाही, मोठा नाही. जो तो आपल्या कामाने मोठा होतो.'' सर्वांना आपली चूक कळली होती. सर्वजण मिळून जीभताईला म्हणाले, ''हो ऽऽ हो ऽऽ आता आम्ही असे कधीच भांडणार नाही. सारे मिळून एक राहू.''

**– हेमलता परदेशी**

**शब्दार्थ : तोरा** – दिमाख, ऐट, डौल. **तोंडाला पाणी सुटणे** – खाण्याची इच्छा होणे. **तावातावाने बोलणे** – रागाने बोलणे. **खडसावणे** – बजावणे, ताकीद देणे. **रुचकर** – चविष्ट. **नम्रता** – विनयशील, मनाचा सौम्यपणा. **सुरात सूर मिसळणे**– सर्वांनी मिळून म्हणणे, दुजोरा देणे.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) साऱ्या चवी एकत्र का आल्या होत्या?
(आ) साखरेने स्वतःचे मोठेपण कसे सांगितले ?
(इ) मिठाने स्वतःचे महत्त्व कसे पटवून दिले?
(ई) जीभताईने कोणता संदेश दिला ?

**प्र. २. कोण ते सांगा.**

(अ) जिच्यामुळे तोंडाला पाणी सुटते –
(आ) खूप बडबड करणारी –
(इ) तावातावाने बोलणारे –
(ई) याच्याशिवाय जेवण बेचव –
(उ) वळवळत ऐटीत येणारी –

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले.**

(अ) ''वा गं वा! काय हिचा तोरा !''
(आ) ''अगं, ए वाकडीतिकडी! बस ना आता खाली!''
(इ) ''तुला खाऊन तर खोकलाच होतो.''
(ई) ''अरे, तुला कोणी खाईल का?''
(उ) ''हो ऽऽ हो ऽऽ आता आम्ही असे कधीच भांडणार नाही.''

**प्र. ४. 'वाकडीतिकडी' सारखे शब्द शोधून लिहा.**

**प्र. ५. खालील वाक्यांत योग्य ठिकाणी वाक्प्रचार घाला व वाक्ये पुन्हा लिहा.**

(तोंडाला पाणी सुटणे, तावातावाने बोलणे, खडसावणे)
(अ) अनेक माणसे रागाने बोलून आपले महत्त्व कमी करतात.
(आ) सीमाने नीताला बजावून सांगितले.
(इ) मिठाई बघून सर्वांना खाण्याची इच्छा झाली.

**प्र. ६. 'नम्र' शब्दाला 'ता' हे अक्षर लावून नम्रता शब्द होतो त्यासारखे शब्द शोधा व लिहा.**

**प्र. ७. हा पाठ संवादरूपात वर्गात सादर करा.**

**प्र. ८. चवींच्या भांडणात सर्वांना जीभेचे महत्त्व पटले. तसे झाड व झाडाच्या अवयवांचे भांडण झाले, तर तुम्हांला कोण महत्त्वपूर्ण वाटेल? का? पाच–सहा वाक्यांत लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून योग्य गतीने समजपूर्वक पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. या पाठाचे विद्यार्थ्यांकडून संवादरूपात सादरीकरण करून घ्यावे.

### प्र. ९. खालील तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र. | चव | पदार्थ/फळे/भाजी |
|---|---|---|
| १. | खारट | |
| २. | तिखट | |
| ३. | गोड | |
| ४. | कडू | |
| ५. | आंबट | |

### प्र. १०. खालील शब्दांत लपलेले शरीराचे अवयव शोधा व लिहा.

उदा., सामान-मान, पोपट-पोट

पाठशिवणी, माननीय, तोंडपाठ, बोटभर, पोटपूजा, गालबोट, नाकतोडा, पायपुसणी, आगबोट.

**उपक्रम :** आपण वेगवेगळी चव असणारे पदार्थ, भाज्या, फळे खातो. ते का खावेत, यांवर घरातील व्यक्तींशी चर्चा करा. त्यांचे महत्त्व वहीत लिहा व मित्रांना सांगा.

- **पाठातील सर्वनामे शोधा व लिहा.**
- **खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.**

(अ) त्याने मला विचारले.
(आ) आपण पतंग उडवूया.
(इ) आम्ही झोपी गेलो.
(ई) तिला तिची चूक कळली.
(उ) त्याने स्वतः झाडून घेतले.

CLJ1HK

**सुविचार**

**आळसे आळस वाढला,**
**आळसे अभ्यास बुडाला.**

**केल्याने होत आहे रे,**
**आधी केलेचि पाहिजे.**

**वाचू आणि हसू.**

**शिक्षिका :** सोनल, तुला रोजच शाळेत यायला उशीर का होतो?
**सोनल :** बाई, चौकात मोठा बोर्ड आहे. पुढे शाळा आहे, सावकाश जा! म्हणून मी हळूहळू येते.

**दुकानदार :** अहो, छत्री घ्या ना! उत्तम आहे. खूप टिकेल.
**गिऱ्हाईक :** कशावरून?
**दुकानदार :** एक गोष्ट लक्षात ठेवली, तर छत्री वर्षांनुवर्षे टिकेल.
**गिऱ्हाईक :** कुठली गोष्ट ?
**दुकानदार :** उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात ही छत्री वापरायची नाही.

- **खालील चित्रांचे निरीक्षण करा. चित्रांखाली लिहिलेल्या म्हणी वाचा. त्या म्हणींचा अर्थ समजून घ्या.**




म्हण – अंथरूण पाहून पाय पसरावे.
अर्थ – परिस्थितीनुसार वागण्याची पद्धत ठरवणे.



म्हण – पुढच्यास ठेच मागचा शहाणा.
अर्थ – एकाच्या अनुभवावरून दुसऱ्याने सावध होणे.



म्हण – हातच्या कंकणाला आरसा कशाला.
अर्थ – समोर दिसणारी वस्तू पाहण्यासाठी पुराव्याची गरज नसते.



म्हण – थेंबे थेंबे तळे साचे.
अर्थ – हळूहळू संचय केला, तर त्यातून मोठा संग्रह होतो.

- **स्वच्छतेविषयीच्या खालील पाट्या वाचा व अशा प्रकारची घोषवाक्ये तयार करा.**

सांडपाणी नको रस्त्यावर,
डासांच्या पैदाशीला घाला आवर.

कचराकुंडीतच कचरा टाकूया,
प्रदूषणाला आळा घालूया.

जिथे तिथे दिसते घाण,
आपल्या मनावर येतो ताण.

# ७. चंद्रावर मी गेलो तेव्हा...

CLSHJ8

- ऐका. म्हणा. वाचा.

चंद्रावर मी गेलो तेव्हा
नव्हता दिवस नव्हती रात्र
प्रकाश आणि अंधाराची
रिमझिम होती मात्र.



चंद्रावर मी गेलो तेव्हा
कापूस कापूस झालो
तरंगत तरंगत इकडे तिकडे
आरामात हिंडलो.



चंद्रावर मी गेलो तेव्हा
पृथ्वी उगवली होती
तिच्या निळ्या चांदण्यात
पौर्णिमा हसत होती.

चंद्रावर मी गेलो तेव्हा
ससा-बिसा नव्हता
आर्मस्ट्राँगच्या पायाचा
मोठ्ठा ठसा होता!

**– राजन साटम**

शब्दार्थ : **कापूस कापूस होणे** – हलके हलके वाटणे, तरंगणे. **पायाचा ठसा** – पावलाची खूण.

## स्वाध्याय



**प्र. १. प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) चंद्रावर कवीला काय दिसले?
(आ) चंद्रावर गेल्यावर कवीची स्थिती कशी झाली?

(इ) चंद्रावरून कवीला पृथ्वी कशी दिसली?

(ई) चंद्रावरचा ठसा कशाचा होता?

**प्र. २. या कवितेत आलेले 'ससाबिसा', 'इकडे तिकडे', 'तरंगत तरंगत' हे शब्द वापरून वाक्ये लिहा.**

**प्र. ३. एखाद्या महिन्यातील पौर्णिमेच्या दिवसाचे निरीक्षण करा व तुमचा अनुभव पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ४. तुम्हांला चंद्रावर जाण्याची संधी मिळाली, तर तुम्ही काय काय पाहाल ते पाच वाक्यांत लिहा.**


**प्र. ५. 'ससाबिसा' या जोडशब्दात 'ससा' हा अर्थपूर्ण शब्द आहे, तर 'बिसा' या शब्दाला अर्थ नाही. या प्रकारचे खालील जोडशब्द वाचा.**

**उपासतापास, टंगळमंगळ, शिराबिरा, शेतीभाती, अर्धामुर्धा, बारीकसारीक, दगडबिगड, झाडबिड, जाडाभरडा, घरबिर, गोडधोड, शेजारीपाजारी, आडवातिडवा, भांडीकुंडी.**

**प्र. ६. कापूस होणे म्हणजे हलकेफुलके होणे यासारखे शब्दसमूह शोधा व लिहा.**

**उपक्रम :** आंतरजालावरून आर्मस्ट्राँगबद्दल माहिती मिळवा व लिहून काढा.

- **खालील वाक्ये वाचा. 'मोर' शब्दाऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये लिहा.**



**उदा., मोर सुंदर आहे.**

१. मोर राष्ट्रीय पक्षी आहे.

२. मोराचा पिसारा सुंदर असतो.

३. मोराच्या डोक्यावर तुरा असतो.

४. मोर पावसाची चाहूल लागताच थुईथुई नाच करतो.

५. मोराला रंगीबेरंगी पिसारा असतो.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.**

(१) .............. बाजारातून भाजी आणूया.
(तुम्ही, आपण, आम्ही)

(२) आज .............. खूप गाणी गायली.
(आपण, स्वतः, आम्ही)

(३) रमेशने .............. आईला जेवायला वाढले.
(स्वतः, तिला, त्याला)

- **खालील शब्द वाचा.**

मी, ही, जी, तू, धू, पू, ऊ, पी, बी, जू, ती या शब्दांना एकाक्षरी शब्द म्हणतात. एकाक्षरी शब्दांतील इ-कार किंवा उ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो **दीर्घ** लिहितात. 'नि' हा एकच शब्द असा आहे की जो एकाक्षरी असूनही **ऱ्हस्व** लिहितात.

खालील शब्दांपासून वाक्ये लिहा.

| मी | तू | ही | पी | जी |
|---|---|---|---|---|

- **वाचा व समजून घ्या.**

एकदा मी व आई मामाच्या गावाला निघालो होतो. बसस्टॅण्डवर आलो. गाडी सुटायला वेळ होता, म्हणून आम्ही बाकावर बसलो होतो. आमच्या शेजारी एक कुटुंब म्हणजे दोन मुले, त्यांची आई व आजी होती. त्यांच्याकडे खूप सामान होते. कोणत्या गाड्या आल्या, कुठे निघाल्या, कुठं थांबल्या या विषयीच्या सूचना स्पीकरवर सांगत होते. या सूचनेनंतर प्रवाशांना सामान सांभाळा, अंगावरचे दागिने सांभाळा,लहान मुलांकडे लक्ष द्या अशा सूचनाही देत होते. तेवढ्यात आमच्या शेजारी बसलेल्या कुटुंबातील सर्वजण बसच्या दिशेने घाई घाईने निघाले. सामान खूप असल्याने बाजूला असलेली पिशवी तिथेच राहिली. पिशवी तिथेच राहिली हे लक्षात येताच बसस्टॅण्डवरच्या गर्दीतून वाट काढत काढत ती पिशवी घेऊन मी ते कुटुंब कुठे दिसते का ते पाहत होतो. त्यांचे नाव ना गाव मला काहीच माहीत नव्हते. त्यांच्यातील लहान मुलगी व आजी बसच्या खिडकीतून बाहेर पाहत होत्या. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. तिने दादा म्हणून हाक मारली. ती बराचवेळ माझ्या शेजारी बसून राहिल्याने तो आवाज माझ्या लक्षात आला. मी त्या दिशेने धावलो. तोपर्यंत आजी गाडीतून खाली उतरून आल्या होत्या. मी त्यांना पिशवी दिली. त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. कमरेचे दहा रूपये काढून माझ्या हातावर ठेवू लागल्या. मी नको नको म्हणत होतो. ''अरे बाळा, मी तुझी आजी ना. तू आजीसाठी धावत पळत आलास, मग खाऊसाठी आजीने दिलेल्या पैशांना नाही म्हणायचे नसते.''असे म्हणत आजीने खूप मायेने माझ्या तोंडावरून हात फिरवला.

## भाषेची ओळख

मराठी भाषेत 'च' आणि 'ज' ही दोन अक्षरे अशी आहेत की त्यांचे उच्चार भिन्न भिन्न केले जातात. काही शब्दांमध्ये 'च'चा उच्चार 'च' आणि काही शब्दांमध्ये 'च्य' असा होतो; तर 'ज'चा उच्चार 'ज' आणि 'ज्य' असा होतो.


खालील शब्द वाचा.

| 'च' उच्चार | 'च्य' उच्चार |
|---|---|
| चौदा | चहा |
| चौक | चार |
| चाक | चक्र |
| चावणे | चिंधी |
| चूल | चिमणी |

| 'ज' उच्चार | 'ज्य' उच्चार |
|---|---|
| जगणे | जग |
| जाग | जादू |
| मांजर | जेवण |
| जोरात | जिना |
| जुना | वजीर |

**शिक्षकांसाठी :** या पृष्ठावर एका मुलाचा बसस्टॅण्डवरील अनुभव दिलेला आहे. विद्यार्थ्यांकडून त्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. त्यांना आलेले अनुभव व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

# ८. अपार प्रेम



एका सरोवराकाठी घनदाट जंगल होते. पशुपक्षी, झाडेझुडपे, डोंगरदऱ्या, कडेकपाऱ्या, ओढे-नाले यांनी वेढलेले हे जंगल होते. गुहा, घरटी, बिळे, वारूळ आणि जाळी अशी सर्व पशुपक्ष्यांची घरे या जंगलात होती. या जंगलातील सरोवर नेहमी कमळांनी फुललेले असायचे, म्हणून या जंगलाचे नाव पडले-कमळबन.

कमळबनात एक कुटुंब राहत होते. हरिण, हरिणी आणि त्यांची दोन पाडसे असे ते सुखी कुटुंब होते. पाडसे खूप खेळायची. एकमेकांना सोडून कुठेही जात नसायची. त्यांना एकमेकांबद्दल खूप जिव्हाळा होता.

एकदा हे कुटुंब सरोवराकाठी पाणी प्यायला निघाले. पाडसे आनंदाने गाणी गात, खेळत, बागडत निघाली होती. त्यांच्यात सावधपणा होता अन् मनात जंगली पशूंची भीती होती. तेवढ्यात त्यांना एका मोठ्या झाडाच्या मागून दोन डोळे चमकताना दिसले. झाडाच्या मागे वाघ उभा होता. कुटुंबाला कळून चुकले, की आता चौघांपैकी एकाला मरावे लागणार.

हरिणी म्हणाली, ''तुम्ही तिघे इथून जा. मी मागून येते.''

हरिण म्हणाले, ''नको, नको, तुम्ही तिघे जा. मी मागे राहतो.''

एक पाडस म्हणाले, ''नको, नको तुम्ही सगळे निघून जा. मी मागे राहतो, म्हणजे तुमचं एखादं बाळ तरी वाचेल.''

वाघाने त्यांचं संभाषण ऐकलं. तो समोर आला. हरिणीचे कुटुंब थरथर कापायला लागले. वाघ म्हणाला, ''घाबरू नका, मी तुम्हांला अभय देत आहे. तुम्ही एकमेकांवर किती प्रेम करता! सगळ्यांच्या हृदयात एकमेकांसाठी त्याग करण्याची भावना आहे. एकमेकांविषयी अपार प्रेम आहे. अशा कुटुंबाला कोणाचं भय नसतं. तुम्ही जा, सुखी राहा.'' असे म्हणून वाघ निघून गेला.



**– शुभदा सुरंगे**

---

**शब्दार्थ : जाळी** – वेलींच्या फांद्या एकत्र येऊन बनलेली. **जिव्हाळा**– प्रेम. **जंगली** – जंगलात राहणारे. **अभय देणे** – निर्भयतेची खात्री देणे. **त्याग करणे**– सोडून देणे. **अपार**– खूप, प्रचंड.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) जंगलाचे नाव 'कमळबन' असे का पडले ?

(आ) हरिणाच्या कुटुंबात कोण कोण राहत होते ?

(इ) हरिणाच्या कुटुंबाच्या मनात कोणते विचार होते ?

(ई) वाघ शिकार न करताच का निघून गेला ?

**प्र. २. 'पशुपक्षी', 'झाडेझुडपे' यांसारखे जोडशब्द पाठात आले आहेत ते शोधा व लिहा.**

**प्र. ३. कोण कोठे राहतात ? शोधा व लिहा.**

| वाघ | पक्षी | उंदीर | साप | माकड | मधमाशी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले.**

(१) ''तुम्ही तिघे इथून जा.''

(२) ''नको, नको तुम्ही तिघे जा''

(३) ''नको, नको तुम्ही सगळे निघून जा''

(४) ''मी तुम्हांला अभय देत आहे.''

**प्र. ५. या पाठातील दोन्ही चित्रांचे वर्णन करा व वर्गात सांगा.**

**प्र. ६. 'जंगल' या शब्दाची खाली दिलेली रूपे वाचा. खालील दिलेल्या शब्दांची अशी रूपे तयार करा.**

उदा., जंगल - जंगलाचा, जंगलात, जंगलाला, जंगलासाठी, जंगलापासून, जंगलातून, जंगली, जंगलाचे, जंगलाच्या.

सरोवर    आनंद    कुटुंब    झाड

**प्र. ७. खालील शब्दांचे तो, ती, ते लावून लिंग ओळखा.**

(१) जीभ    (२) चिंच    (३) वाघ    (४) कुटुंब

(५) पाणी    (६) गुहा    (७) पाडस    (८) हरिणी

**प्र. ८. खालील शब्दांचे वचन ओळखा व लिहा.**

(१) ओढे    (२) नाले    (३) पाडसे

(४) वाघ    (५) जंगल    (६) बाळ

**प्र. ९. हरणाच्या पिलाला 'पाडस' म्हणतात. खालील प्राण्यांच्या पिलांना काय म्हणतात ते लिहा.**

(१) वाघ -    (४) शेळी -

(२) मांजर -    (५) गाय -

(३) सिंह -    (६) घोडा -

**प्र. १०. खालील शब्द दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी घाला.**

(सरोवराचे, अपार, अभय, हृदयात)

(१) बलाढ्य सिंह जेव्हा ········· देतो, तेव्हा आश्चर्य वाटते.

(२) आपल्या देशावर ········· श्रद्धा असावी.

(३) ········· निळेशार पाणी चमकत होते.

(४) त्याग करण्याची भावना ········· असावी लागते.

**प्र. ११. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(१) तुमच्या कुटुंबात किती माणसे आहेत?


(२) तुमचे तुमच्या भावंडांवर प्रेम आहे का?

(३) तुम्ही तुमच्या भावंडांसाठी काय करता?

**प्र. १२. तुम्ही भावंडासाठी एखाद्या गोष्टीचा त्याग केला, असा एखादा प्रसंग थोडक्यात सांगा.**

- **खालील गोलातील शब्दांना शेजारच्या माळेतील योग्य मणी लावा. नवीन शब्द तयार करा.**

**उदा., माया – मायाळू**





- **वाचा.**

कुंभकोणम् येथील एका पाठशाळेतील वर्गात गणिताचा तास चाललेला होता. वर्गशिक्षक गणिताचा सिद्‌धांत मुलांना समजावून सांगत होते. 'एखाद्या संख्येला त्याच संख्येने भागले असता भागाकार नेहमी एक येतो', ते म्हणाले. साऱ्या मुलांनी तो सिद्‌धांत आपल्या वह्यांमध्ये टिपून घेतला नि काहींनी तर तो मनातल्या मनात पाठही करून टाकला. तेवढ्यात एक लहानसा मुलगा ताडकन उभा राहिला आणि वर्गशिक्षकांना म्हणाला, ''गुरुजी, तुमचा हा सिद्‌धांत थोडासा चुकीचा आहे.'' शिक्षकांनी आपल्या चष्म्याच्या जाड भिंगातून त्या मुलाकडे पाहिले. त्यांचा चेहरा विलक्षण गंभीर झाला. ते काहीशा करड्या आवाजात म्हणाले, ''तुझं म्हणणं स्पष्ट करून सांग पाहू.'' यावर तो मुलगा खड्या आवाजात धीटपणे म्हणाला, ''सर, शून्याला भागले तर?'' त्या चिमुरड्या मुलाचा हा प्रश्न ऐकताच त्या शिक्षकांना त्याच्या बुद्‌धिमत्तेचे विलक्षण आश्चर्य वाटले. हा मुलगा म्हणजेच पुढे श्रेष्ठ गणिती तज्ज्ञ म्हणून प्रसिद्‌ध झालेले श्रीनिवास रामानुजन् होय!

**शिक्षकांसाठी :** वाचनासाठी दिलेल्या परिच्छेदाचे विद्यार्थ्यांकडून अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# ९. चला पुढे! चला पुढे!

'प्रतीक, आता उठ बरं, अरे, सात वाजलेसुद्‌धा! बघ बघ, किती सूर्य वर आलाय.' प्रतीकच्या आई सुधाताई गेले तासभर हेच बोलत होत्या अन् प्रतीकचं एकच बोलणं चालू होतं. 'आणखी पाच मिनिटांनी उठतो गं.' शेवटी मोठ्या अनिच्छेनं प्रतीक उठला अन् डोळे चोळत गॅलरीत आला. बाहेरचे प्रसन्न वातावरण पाहून त्याला उत्साहाचे पंखच फुटले. तोंड धुऊन त्याने दूध घेतले. 'आई, जरा फिरून येतो गं' म्हणत निघालाही. त्याला जाताना पाहून सुधाताईंना वाटलं आपण स्वप्नात तर नाहीना!



प्रतीक छान शीळ घालतच भेटणाऱ्या पक्ष्यांशी हळुवार संवाद साधत निघाला. जवळच नदी होती. प्रतीकच्या मनात विचार आला – 'खरंच ही नदी किती सुंदर आहे; पण ती दिवस-रात्र धावूनपळून कशी थकत नसेल ? '

तो नदीला म्हणाला,

''नदीताई, नदीताई, किती करतेस धावपळ!
घे ना विसावा एक तरी पळ!
कसा येत नाही तुला थकवा,
कोठून मिळवतेस उत्साह नवा नवा ?''

लांबून त्याला खळखळून हसू ऐकू आलं. तो नदीताईचाच आवाज होता.

ती म्हणत होती –

''बरं का प्रतीक,
नको करूस माझं कवतिक.
अरे, धावणं माझा प्राण,
तोच माझा श्वास जाण.
पुढं जाण्यात मला आनंद,
निर्मलता मिळवणं माझा छंद !''

इतक्यात एक वाऱ्याची झुळूक नाचत, बागडत आली. झाडाखालची पानं उडवत, त्यांच्याशी खेळत ती पुढं निघाली. प्रतीकनं तिला विचारलं –

''झुळुकताई, झुळुकताई, जरा थांब थांब.
कसली गं घाई, कुठं निघालीस लांब ?
सारखं धावायचा, येत नाही कंटाळा ?
का तीच तुझी छान छान शाळा ?''

झुळूकही गोड हसली व म्हणाली, ''प्रतीक, ओळखलंस ? एकदम बरोबर. सदा चालणं, धावणं मला खूप आवडतं बरं!'' अन् झुळूक पानांशी खेळायला निघूनही गेली.

प्रतीकनं खाली डोकावून पाहिलं तर काय ? मुंग्यांची ही भली रांगच रांग त्याला दिसली. साऱ्या मुंग्या मोठ्या शिस्तीत, घाईनं चालल्या होत्या. त्या मुंग्यांना प्रतीक म्हणाला,

''चालून, चालून दुखतात का पाय,
घ्या विश्रांती हाच उपाय!''



त्याचं बोलणं ऐकताच साऱ्या मुंग्या हसल्या अन् एका स्वरात गात म्हणाल्या,

"दिसतो आम्ही चिमुकल्या जरी,
उत्साह आमुच्या सदा अंतरी.
सदा चालणं हा आमचा स्वभाव,
तोच देतो आम्हांला मिळवून भाव."

मुंग्यांचा संदेश ऐकला आणि प्रतीकने मनाशी ठरवलं, आपणही पुढे जात राहायचं. नाही आता थांबायचं.

सूर्य, नदी, झुळूक व मुंग्या प्रतीकला म्हणाल्या,
"चला पुढे ! चला पुढे ! देतो आम्ही संदेश.
तोच मिळवून देईल सर्वांना सुयश"

**– डॉ. इंदुमती अरकडी**

---

**शब्दार्थ : अनिच्छेने** – इच्छा नसताना. **उत्साहाचे पंख फुटणे** – खूप उत्साह येणे. **शीळ घालणे** – आनंदाने शिटी वाजवणे. **हळुवार** – हलकेच. **पळ** – क्षण. **निर्मलता** – स्वच्छता.



## स्वाध्याय

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) 'आणखी पाच मिनिटांनी उठतो गं म्हणणारा'–.................

(आ) अरे धावणं माझा प्राण म्हणणारी– ...........................

(इ) नाचत, बागडत येणारी– ....................................

(ई) मोठ्या शिस्तीने, घाईने जाणारी–...........................

**प्र. २. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सुधाताई प्रतीकला काय सांगत होत्या ?

(आ) प्रतीकला उत्साहाचे पंख का फुटले ?

(इ) प्रतीक नदीला काय म्हणाला ?

(ई) झुळूक पुढे जाताना काय करत होती ?

(उ) मुंग्यांनी प्रतीकला कोणता संदेश दिला ?

**प्र. ३. खालील शब्दसमूहांना दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.**

(१) शीळ घालणे –
  (अ) शिट्टी वाजवणे.
  (आ) आनंद व्यक्त करणे.
  (इ) मित्राला बोलावणे.

(२) उत्साहाचे पंख फुटणे –
  (अ) नवीन पंख येणे.
  (आ) उत्साहाने आकाशात उंच उडणे.
  (इ) खूप उत्साह येणे.

**प्र. ४. प्रतीकला वाटेत कोणकोण भेटले ? त्यांनी प्रतीकला कोणता उपदेश केला ?**

**प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) तुम्ही रोज किती वाजता उठता?

(आ) तुम्ही सकाळी फिरायला जाता का?

(इ) आईने उठवले, तर उठता की स्वतःहून उठता?

**प्र. ६. (अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(१) उत्साही (२) कंटाळा (३) आनंद (४) थकवा

**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(१) दिवस × (२) लांब ×

**प्र. ७. 'धावूनपळून' यासारखे शब्द लिहा.**

**प्र. ८. या पाठात 'पळ' हा शब्द आला आहे. पळ या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**

| | | | |
|---|---|---|---|
| मी एकही पळ वाया घालवत नाही. | **पळ** | **–** | **क्षण** |
| धावण्याच्या शर्यतीत मंदाला सगळे सूचना देत होते, जोरात पळ. | **पळ** | **–** | **पळणे** |

**वरीलप्रमाणे खालील शब्दांचे दोन अर्थ शिक्षकांच्या मदतीने माहीत करून घ्या. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) वर (२) मान (३) पाठ (४) नाद

(५) वावर (६) काप (७) फोड (८) नाव

**प्र. ९. नदी आणि सूर्य यांनी आपले काम थांबवले, तर काय होईल असे तुम्हांला वाटते? नदी व सूर्य यांच्यातील संवाद पाच ते सात वाक्यांत कल्पना करून लिहा.**

**प्र. १०. सतत काम करणाऱ्या प्राणी व पक्ष्यांची नावे लिहा.**

**प्र. ११. 'नदी' या शब्दातील 'न' या अक्षरावर अनुस्वार दिला, तर दुसऱ्या अर्थाचा 'नंदी' हा शब्द तयार होतो. या शब्दाचा अर्थ मूळ शब्दापेक्षा वेगळा असतो. अशाप्रकारच्या खालील शब्दांच्या जोड्यांचा अभ्यास करा. असे शब्द शोधा व लिहा.**

आबा – आंबा भीती – भिंती माडी – मांडी

चिता – चिंता कुडी – कुंडी वदन – वंदन

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करून तुमचा अनुभव वहीत नोंदवा.

**सुविचार**

लवकर निजे, लवकर उठे ।
त्यास आरोग्य, धनसंपदा लाभे ।।

ज्या दिवशी आपण हसणार नाही,
तो दिवस वाया गेला असे समजा ।।

• वाचा.


## अजिंठा

अजिंठा लेणी केवळ महाराष्ट्रात, भारतात नव्हे तर संपूर्ण जगात प्रसिद्ध आहेत. औरंगाबाद जिल्ह्याच्या उत्तरेला १०८ किलोमीटर अंतरावर या लेणी आहेत. सह्याद्री पर्वताच्या 'सातमाळ' रांगेत ही लेणी खोदलेली आहे. ह्यांचा शोध १८१८ मध्ये आकस्मिकपणे लागला. इंग्रज अधिकारी स्मिथ हा अजिंठ्याच्या डोंगरमाथ्यावर भटकंती करत असताना, त्याला ही गुहा सापडली. येथे एकूण तीस लेणी (गुंफा) आहेत. अजिंठ्याची लेणी ही वास्तूकलेसाठी आणि मूर्तिकलेसाठी प्रसिद्ध असली, तरी ही लेणी मुख्यत: चित्रकलेसाठी प्रसिद्ध आहे. इथल्या चित्रशैलीचा प्रभाव भारत व भारताबाहेरच्या कलेवरही पडला आहे. सुमारे दीड-दोन हजार वर्षांपूर्वीची ही चित्रे आहेत; पण आजदेखील त्याचे रंग ताजे वाटतात. चित्रे काढण्यासाठी भिंतीवर आधी माती, शेण, भाताचा भुसा याचा गिलावा देत असत. त्यावर चुन्याचा पातळ थर दिला जाई. गेरूने चित्रांची बाह्यरेषा रेखत व त्यात रंग भरले जात. अजिंठ्याच्या चित्रकारांनी मुख्यत: काळा, पांढरा, पिवळा, हिरवा, तांबडा आणि निळा हे रंग वापरले आहेत. हे सर्व रंग नैसर्गिक पदार्थांपासून केले आहेत.

सर्व चित्रे अनेक प्रकारची आहेत. यांमध्ये व्यक्ती, पशू, पक्षी, फुले, अलंकार, खाद्यपदार्थ आहेत. प्रत्येक मूर्तींच्या चेहऱ्यावर भाव आहेत. साऱ्या विश्वाला भूषण असलेली ही अजिंठा लेणी एकदा तरी पाहायलाच हवी.

### आपण समजून घेऊया.

• खालील चित्राचे निरीक्षण करा. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुढील चौकटीत लिहा.




१. कलिंगडाचा आकार कसा आहे?


२. कलिंगडाचा रंग कोणता आहे?

३. कलिंगडाची चव कशी असते?

तुम्ही उत्तरांमध्ये लिहिलेले शब्द 'कलिंगड' या नामाबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द आहेत. **अशा शब्दांना 'विशेषण' म्हणतात.**

• खालील चित्रांना दोन-दोन विशेषण लावा.







- **खालील चौकोनात काही म्हणी लपल्या आहेत. चौकोनातील म्हणी शोधा आणि लिहा. शिक्षकांच्या मदतीने अर्थ माहीत करून घ्या.**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ | क | डे | आ | ड | ति | क | डे | वि | ही | र |
| जा | रा | बा | य | र | को | र | य | था | ना | ग |
| गा | वे | प | त्या | ह | ल्हा | ना | रा | जा | व | र्वा |
| व | त | त | बि | पा | का | ही | त | था | ड | चे |
| क | से | सा | ळा | पा | क | त्या | प्र | जा | ती | घ |
| री | भ | बे | व | चा | डी | ला | रा | जी | चे | र |
| ते | रा | टा | र | मा | सों | ड | अ | रा | मी | खा |
| रा | वे | पा | ना | ल | गे | र | ति | त्र | ठ | ली |
| व | न | क | गो | ग | फा | क | ते | थो | अ | ल |
| बै | ल | री | बा | पा | र | शा | थे | डी | ळ | क्ष |
| ल | गे | ला | झो | पा | के | ला | मा | ती | णी | ण |

१. इकडे आड तिकडे विहीर.
२. आयत्या बिळावर नागोबा.
३. कोल्हा काकडीला राजी.
४. कर नाही त्याला डर कशाला.
५. बैल गेला, झोपा केला.
६. हपापाचा माल गपापा.
७. नावडतीचे मीठ अळणी.
८. करावे तसे भरावे.
९. गाव करी ते राव न करी.
१०. अति तेथे माती.
११. बाप तसा बेटा.
१२. गर्वाचे घर खाली

CMBNHI

- **वाचा.**

एक कवी होता. तो खेडेगावात राहायचा. सुंदर सुंदर कविता करायचा. एकदा तो मिठाईच्या दुकानात बसला होता. त्याने मिठाईवर छानशी कविता लिहिली. मिठाई विक्रेत्याला वाचून दाखवली अन् ती कविता त्याला देऊन टाकली. दुसऱ्या दिवशी कवीच्या मुलाने मिठाईच्या दुकानातून लाडू आणला. कवीने पाहिले, त्याने कविता लिहिलेल्या कागदावरच लाडू दिला होता. कवीला खूप दु:ख झाले.

असाच एके दिवशी तो भांडी विक्रेत्याच्या दुकानासमोरून जात होता. चकचकीत भांडी पाहून त्याला सुरेख कविता सुचली. त्याने ती झटपट लिहिली अन् भांडी विक्रेत्याला वाचून दाखवू लागला. भांडी ठोकता ठोकता त्याने ऐकली. भांडी ठोकण्याच्या आवाजापुढे कवीच्या कवितेतील बरेच शब्द त्याला ऐकूही आले नाहीत. कवीला अतोनात वाईट वाटले.


उन्हाळ्यात थंड पाण्यासाठी कवी माठ आणायला गेला. तेथील सुबक व विविध आकाराच्या कुंड्या, पणत्या, झुंबरे, चित्रे, बोळकी, रांजण, माठ पाहून त्याने शीघ्र कविता लिहिली; पण ती कविता ऐकण्याऐवजी तो विक्रेता हटून बसला, की माझ्या या माठावर कविता करा. हा माठ मला खूप आवडतो.

लोकांना कविता व त्यांचे महत्त्व कळत नाही हे पाहून कवीला क्षणभर वाईट वाटले, मात्र त्याचा फारसा विचार न करता कवीने आपली आवड आयुष्यभर जोपासली. लोकांना काय आवडते, काय आवडेल यापेक्षा आपल्या स्वत:ला काय आवडते याचा विचार करणे आवश्यक असते.

# १०. छोटीशी बी

- **ऐका. म्हणा. वाचा.**

छोटीशी बी, रुसू नको
जमिनीत नुसती बसू नको,
माती-पाण्याचे गुण घेऊन
वर यायला विसरू नको.



कोंबा कोंबा रुसू नको
देठात लपून राहू नको,
लाल तांबूस रंग घेऊन
पान द्यायला विसरू नको.



पाना पाना, रुसू नको
बालपणात बसू नको,
दोन हातांची ओंजळ करून
कळी द्यायला विसरू नको.



कळी कळी, रुसू नको
घट्ट पाकळ्यांत बसू नको,
पाकळ्यातून फुलून-खुलून
फूल द्यायला विसरू नको.

फुला फुला, रुसू नको
कोण बघतंय बघू नको,
रंगगंधात डोल डोलून
'बी' द्यायला विसरू नको.



**- माया धुप्पड**

**शब्दार्थ : ओंजळ** - दोन्ही तळहात जोडल्यावर तयार झालेला खोलगट भाग. **डोलणे** - मान हालवणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवयित्रीने 'बी'ला वर येण्यासाठी कोणाचे गुण घ्यायला सांगितले?
(आ) कोंबाने कोणते रंग घेऊन वर यावे असे कवयित्रीला वाटते?

(इ) पानाला बालपण सोडून देण्यास कवयित्री का सांगते ?


(ई) कवयित्री कळीपासून कोणती अपेक्षा करते ?

(उ) कवयित्री फुलाला कोणती गोष्ट विसरू नको म्हणून सांगते ?

**प्र. २. 'बी' चे पुन्हा बीमध्ये रूपांतर होण्याच्या क्रिया क्रमाने लिहा.**

छोटीशी बी → ☐ → ☐ → ☐ → ☐ →

**प्र. ३. 'हात' या शब्दाचे विविध उपयोग लिहा.**




**प्र. ४. या कवितेत रुसू, बसू यांसारखे शब्द आले आहेत, अशा शब्दांची यादी लिहा.**

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन वाचा व समजून घ्या. दिलेल्या शब्दांचे अनेकवचन करा.**

उदा., बी –बिया, सुई– सुया

(१) कळी (२) कैरी (३) पाकळी (४) वही

**प्र. ६. खालील यादी वाचा. त्यांतील बियांपासून व फांदीपासून तयार होणारी झाडे असे वर्गीकरण लिहा.**

उदा., गुलाब– फांदीपासून, पारिजातक – बियांपासून,

मोगरा, जास्वंद, चाफा, गोकर्ण, कोरंटी, कमळ, आंबा, जांभूळ, केळी, फणस, ऊस, ज्वारी, बाभूळ, पानफुटी, कांदा, लसूण, झेंडू, सूर्यफूल.

**प्र. ७. वाचा व लिहा.**

दोन हात एकत्र करतो, त्याला आपण ओंजळ म्हणतो.

ओंजळभर पाणी, ओंजळभर धान्य, ओंजळभर फुले असे शब्दप्रयोग बोलण्यात करतो. टिचभर, हातभर, बोटभर, पसाभर हे शब्द वापरून वाक्ये लिहा.

**उपक्रम :** विविध फुलझाडांची चित्रे काढा व रंगवा.

**प्रकल्प :**

वर्षभरात घरी खाल्लेल्या फळांच्या बिया गोळा करा. त्यांच्या आकारांचे निरीक्षण करा. एका मोठ्या कॅलेंडरसारख्या रंगीत कागदांवर पानाफुलांची आकृती काढा. त्यावर वेगवेगळ्या आकाराच्या बिया चिकटवा. रंग द्या. तो कागद वर्गात, घरी भिंतीवर लावा.


- **खालील घोषवाक्ये वाचा.**

झाडे वाढवूया,
शहरे वाचवूया.

जिथे स्वच्छ हवा,
तिथे आरोग्याचा ठेवा.

कावळा म्हणतो काव–काव,
माणसा–माणसा झाडे लाव.

- **खालील चित्राला लावलेली विशेषणे वाचा. दुसऱ्या चित्राला योग्य विशेषणे लावा.**








- **वाचा.**

मराठी भाषेतील शब्दांच्या शेवटी येणारा इ-कार किंवा उ-कार उच्चारानुसार **दीर्घ** लिहितात.

उदा. आई, केळी, करंजी, खिडकी, मामी, वही, संधी, सुपारी, काकी, कवी, पेरू, वाळू, मधू, खेळू, माऊ, गुरू, सुरू, सांगू, काजू.

'आणि' व 'परंतु' या शब्दांचा इ- कार व उ- कार **ऱ्हस्व** लिहितात.

- **खालील चित्रे पाहा. त्यांची नावे लिहा.**

**शोध घेऊया.**

- **खालील सूचना फलक वाचा. खालील सूचना कोठे-कोठे असतात ते सांगा. तुमच्या शाळेच्या परिसरात कोणकोणत्या सूचनांचे फलक लावता येतील, ते मित्रांशी चर्चा करून ठरवा. तसे सूचना फलक तयार करा.**

हा खासगी रस्ता आहे.

येथे कचरा टाकू नये.

येथे जाहिराती लावू नयेत.

येथे थुंकू नये.

येथे वाहने लावू नयेत.

हे पिण्याचे पाणी आहे.

# ११. वाईटातून चांगले



एका गावात दोन शेतकरी राहत होते. त्यांपैकी एक भाऊराव तर दुसरे बाबाराव. भाऊराव मनमिळाऊ आणि प्रत्येकाला मदत करणारे होते. याच्या उलट बाबाराव अहंकारी व भांडखोर स्वभावाचे होते. भाऊरावांना खूप मित्र होते, तर बाबारावांच्या वाटेला कुणी जात नसे. दुर्दैवाने त्या दोघांची शेते शेजारी होती.

गावातले लोक भाऊरावांना म्हणत, 'बाबा रे, त्या तुझ्या शेजाऱ्यापासून सावध राहा. तो फार दुष्ट माणूस आहे. त्याच्याशी कुणी संबंध ठेवत नाही. त्याला कुणी मित्रही नाही.'

त्यावर भाऊराव म्हणायचे, 'काही काळजी करू नका. एक ना एक दिवस असा येईल, की तो दुष्ट माझा मित्र होईल.' त्यांचे ते बोलणे ऐकून सारे हसत असत.

दिवसांमागून दिवस निघून गेले. भाऊराव आणि बाबाराव यांची वृत्ती काही बदलली नाही. एकदा भाऊरावांच्या घरी मुलीचे लग्न होते. सर्वांना निमंत्रणे पाठवण्यात आली. तसेच बाबारावांना देखील निमंत्रण दिले गेले; पण शेजारधर्म म्हणून त्यांनी काही मदत तर केलीच नाही आणि लग्नालाही आले नाहीत.

एकदा बाबारावांचा मुलगा फार आजारी पडला. तेव्हा बाबाराव गावाला गेले होते. त्या गावात मोठा दवाखाना नसल्याने मुलाला तातडीने शेजारच्या गावी दवाखान्यात नेणे गरजेचे होते. मुलाची आई नेणार कशी? त्यातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. बाबारावांचा स्वभाव माहीत असल्यामुळे कुणीही मदतीला आले नाही. भाऊरावांना जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा ते पावसातही बैलगाडी घेऊन मदतीला आले. मुलाला तातडीने त्यांनी शहरात नेले. शहरातल्या



डॉक्टरांनी मुलावर तातडीने उपचार केले. ते म्हणाले, 'जर या मुलाला दवाखान्यात आणायला थोडा उशीर झाला असता, तर हा मुलगा काही वाचला नसता.' हे ऐकून मुलाच्या आईला मोठा धक्का बसला. तिने भाऊरावांचे आभार मानले.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे योग्य गतीने समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करून घ्यावे.

गावाहून परत आल्यानंतर जेव्हा बाबारावांना ही घटना समजली, तेव्हा ते हादरले. ज्याच्याशी मी वाईट वागलो, त्यांनीच आपल्या मुलाचे प्राण वाचवले. ही गोष्ट त्याच्या मनाला लागून गेली. भाऊरावांच्या घरी जाऊन त्यांचे आभार मानले आणि हात जोडून म्हणाले, 'मी तुमच्याशी फार वाईट वागलो. मला क्षमा करा.' त्या दिवसापासून ते सर्वांशी प्रेमाने वागू लागले.

**– सुभाषचंद्र वैष्णव**

**शब्दार्थ : मनमिळाऊ** – मिळून मिसळून वागणारा. **अहंकारी** – स्वत:ला श्रेष्ठ समजणारा. **वाटेला जाणे** – त्रास देणे. **दुष्ट** – वाईट वागणारा. **वृत्ती** – स्वभाव. **शेजारधर्म** – शेजाऱ्याबरोबर वागणुकीची रीत, पद्धत. **तातडीने** – ताबडतोब. **आभार मानणे** – धन्यवाद देणे.



## स्वाध्याय

**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) भाऊरावांचा स्वभाव कसा होता?

(आ) बाबारावांचा स्वभाव कसा होता?

(इ) भाऊरावांनी सर्वांना कशाची निमंत्रणे दिली?

(ई) बाबारावांच्या मुलाला शहरातील दवाखान्यात का न्यावे लागले?

(उ) डॉक्टरांनी मुलाबद्दल काय सांगितले?

(ऊ) बाबारावांनी क्षमा का मागितली?

**प्र. २. खालील शब्दांच्या योग्य अर्थावर ✓ खूण करा.**

(अ) आभार मानणे.

(१) नमस्कार करणे.

(२) पाया पडणे.

(३) धन्यवाद देणे.

(आ) वाटेला जाणे.

(१) खोडी काढणे.

(२) रस्त्याने जाणे.

(३) धक्का बसणे.

**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (१) सखा – | (२) माफी – | (३) विवाह – |
| (४) जलद – | (५) स्वभाव – | (६) आवश्यक – |

**प्र. ४. खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लावा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| (अ) दुर्दैव | (१) शत्रू |
| (आ) सावध | (२) चांगला |
| (इ) मित्र | (३) सावकाश |
| (ई) वाईट | (४) सुदैव |
| (उ) तातडीने | (५) बेसावध |

**प्र. ५. 'धक्का' यासारखे एकच अक्षर एकमेकांना जोडून तयार होणारे शब्द लिहा.**

**प्र. ६. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

(१) पावसातही (२) भाऊरावाचा (३) गावातला (४) दिवसापासून

**प्र. ७. खालील शब्द असेच लिहा.**

दुर्दैव, दुष्ट, वृत्ती, लग्न, निमंत्रणे, आमंत्रण, शेजारधर्म, स्वभाव, डॉक्टर, प्राण, गोष्ट, सर्वांशी.

- **वाचा व लिहा.**

नष्ट, खाष्ट, उष्ट, स्पष्ट, पिष्टमय, वितुष्ट, संतुष्ट, इष्ट, अनिष्ट, क्लिष्ट, चेष्टा, महाराष्ट्र, सौराष्ट्र.

**खेळ खेळूया.**

कंसातील अक्षरांचा उपयोग करा. काय म्हणतात सांगा. (च, ध, अ, शि)

(१) मोठ्या बहिणीला म्हणतात – [ क्का ]

(२) श्रीखंड यापासून बनवतात – [ क्का ]

(३) दुसऱ्याला ढकलणे – [ क्का ]

(४) ठसा या शब्दाचा समानार्थी शब्द – [ क्का ]

**आपण समजून घेऊया.**

- **खाली दोन प्रकारचे शब्दसमूह दिलेले आहेत. त्या शब्दसमूहांपैकी कोणत्या शब्दसमूहावरून अर्थ कळतो ते समजून घ्या.**

| शब्दसमूह १ | शब्दसमूह २ | शब्दसमूहाचा अर्थ कळतो तो शब्द |
|---|---|---|
| १. सलमाने जेवण | सलमाने जेवण केले. | केले. |
| २. तो जनाची वाट | तो जनाची वाट पाहू लागला. | पाहू लागला. |
| ३. मी चेंडू | मी चेंडू उडवला. | उडवला. |

दुसऱ्या शब्दसमूहांत कोणती क्रिया झाली हे दाखवणारे शब्द दिले आहेत. उदा., केले, पाहू लागला, उडवला. या शब्दांमुळे वाक्यांचा अर्थ कळतो. **या शब्दांना 'क्रियापद' म्हणतात.**

- **खालील वाक्यांतील क्रियापदांना अधोरेखित करा.**

(१) सीमा घरात गेली.
(२) ती आईकडे आश्चर्याने पाहतच राहिली.
(३) शाळा भरण्याची वेळ झाली होती.
(४) आम्ही कसे शाळेत येऊ?

- **क्रियापदे घालून वाक्ये पूर्ण करा.**

(अ) चित्राचा कालच वाढदिवस..........
(आ) बाईंनी रमेशचे कौतुक ..........
(इ) दोघांनी मिळून शिरा ..........
(ई) आईने मावशीला पाणी ..........

CHUFQT

# १२. शाळा नको आताच सुटायला

- ऐका. म्हणा. वाचा.




पाटी नको आताच फुटायला
शाळा नको आताच सुटायला

भरभर सारे आवरून घेऊया
काय म्हणतात गुरुजी, ऐकूया
चला ज्ञानाचा खजिना लुटायला
शाळा नको आताच सुटायला

इतिहासामध्ये राजा आणि राणी
मराठीत ही गोड गोड गाणी
गणितातली कोडी लागली सुटायला
शाळा नको आताच सुटायला

चंद्रताऱ्यांना चला निरखूया
विज्ञान गंमतीही पारखूया
इंग्रजीचे शब्द लागले आठवायला
शाळा नको आताच सुटायला

बाई सांगतात माहिती अवांतर
गुरुजी देतात धडे निरंतर
यशाची शिखरे लागलीत दिसायला
शाळा नको आताच सुटायला

शाळा नाही तुरुंग, आहे ज्ञानाचे द्‌वार
सगळ्यांसह मिळवू ज्ञान अपार
जग लागले आता कुठे समजायला
शाळा नको आताच सुटायला

**– ज्योती कदम**

---

**शब्दार्थ : ज्ञानाचा खजिना लुटणे** – ज्ञानाची संपत्ती मिळवणे. **निरखणे** – काळजीपूर्वक बघणे. **कोडे सुटणे** – प्रश्न सुटणे, उत्तर मिळणे. **पारखणे** – काळजीपूर्वक परीक्षा करणे. **धडे देणे** – चांगली शिकवण, संस्कार देणे. **निरंतर** – नेहमी. **द्‌वार** – दार. **अपार** – अमर्याद.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) विद्यार्थ्यांना शाळेत कशासाठी जायचे आहे?
(आ) विद्यार्थ्यांना विज्ञानातले काय जाणून घ्यायचे आहे?

(इ) यशाची शिखरे केव्हा दिसतील?

(ई) विद्यार्थ्यांने ज्ञानाचे द्वार कशाला म्हटले आहे?

**प्र. २. योग्य पर्याय निवडा.**

(अ) शाळा नको आताच सुटायला – म्हणजे

(१) शाळेची घंटा न वाजणे.

(२) शाळा सुटण्याची वेळ न होणे.

(३) विद्यार्थ्यांचे शिक्षण मधेच बंद पडणे.

(ब) जग लागले आता कुठे समजायला –

(१) जगभर प्रवास केला.

(२) जगातील घडामोडी समजू लागल्या.

(३) जगाचा नकाशा समजला.

(क) यशाची शिखरे लागतील दिसायला – म्हणजे

(१) यश नावाच्या पर्वतावर चढणे.

(२) गिर्यारोहक बनून बक्षीस मिळवणे.

(३) शिखराप्रमाणे उंच व भरघोस यश प्राप्त करणे.

**प्र. ३. कवितेतील शेवट समान असणाऱ्या शब्दांच्या जोड्या लिहा.**

उदा., फुटायला – सुटायला.

**प्र. ४. 'फुटायला' या शब्दामध्ये फुटणे हे क्रियापद आहे, तसे खालील शब्दांतील क्रियापदे ओळखा.**

| दिलेला शब्द | क्रियापद |
|---|---|
| सुटायला | ............ |
| लुटायला | ............ |
| आठवायला | ............ |
| दिसायला | ............ |
| समजायला | ............ |

**प्र. ५. धडा देणे, धडा शिकवणे, धडाधडा बोलणे या वाक्प्रचारांचे अर्थ समजून घ्या व वाक्यांत उपयोग करा.**

**प्र. ६. अपार, अवांतर, निरंतर, कोडी हे शब्द खालील वाक्यांत योग्य ठिकाणी भरा.**


(अ) मराठीतील शब्द ............ सोडवायला मला आवडतात.

(आ) श्रमजीवी लोक ............ कष्ट करतात.

(इ) आई-बाबा मुलांवर ............ प्रेम करतात.

(ई) ............ वाचनामुळे आपले ज्ञान वाढते.

प्र. ७. 'शाळा' या संबंधित शब्द लिहा.




**खेळ खेळूया.**

(१) वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटाने नाव सांगावे. सांगितलेल्या नावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे नाव दुसऱ्या गटाने सांगावे. अशा पद्धतीने नावांच्या भेंड्यांचा खेळ खेळावा.
उदा., माधव → वजन → नमिता → तारीख → खाऊ → ऊस → सर्कस....

(२) मी तर आनंदाने उडालेच. यशाने त्याच्या डोक्यात हवा गेली. गर्वाचा फुगा फुटला असे आपण बोलतो. 'उडणे', 'हवा जाणे', 'फुगा फुटणे' या क्रियांचा शब्दशः अर्थ येथे अभिप्रेत नाही. तशा क्रिया प्रत्यक्ष घडतही नाहीत, पण मनातला भाव व्यक्त होतो. असे अनेक शब्दप्रयोग रोजच्या बोलण्यात आपण सहज करतो. अशा शब्दप्रयोगांची यादी करा. मित्रमैत्रिणींशी गप्पा मारताना त्यातील गंमत अनुभवा.

- खालील उतारा वाचा व त्यात आलेले वाक्प्रचार व म्हणी शोधा. लिहा.

दीपा हिरमुसल्या चेहऱ्याने घरी आली. तिचा पडलेला चेहरा पाहून आई स्वतःशीच म्हणाली, 'दीपा नेहमी हसतमुख असते. आज काय झालं असेल? विचारायला पाहिजे.'

आई म्हणाली, "अगं दीपा, तुझं कुणाशी बिनसलंय का? हल्ली तुझी मैत्रीण गीता तुझ्याबरोबर दिसत नाही."

दीपा म्हणाली, "आई, मी गीताच्या बोलण्याकडे कानाडोळा करायचं ठरवलं आहे. अति झालं नि हसू आलं, असंच वागते सध्या ती. अति तिथं माती, हे तिला कसं समजत नाही? ज्याला त्याला उपदेशाचे डोस पाजत असते. अति शहाणा त्याचा बैल रिकामा, असं तिच्या पाठीमागे सगळे म्हणतात. नमनाला घडाभर तेल घालायची तिची सवय तुला माहीतच आहे. आई हल्ली सगळ्या मैत्रिणी तिच्यापासून चार हात लांबच राहतात. गीताला वेळीच सावध केलं पाहिजे. काही झालं तरी गीता माझी जीवश्च कंठश्च मैत्रीण आहे. तिच्यासाठी जीव तुटतो माझा. तिला कोणी नावं ठेवली, तर माझ्या जिवाची घालमेल होते."

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उतारे/परिच्छेद देऊन त्यातील म्हणी ओळखण्यास सांगाव्या. म्हणींचे अर्थ समजावून सांगावे.

**वाचू आणि हसू.**

| | | |
|---|---|---|
| **एक गृहस्थ** | : | हॉटेलमधील वेटरला-हे बघ, मला 'लाईट हवंय'. काहीही आण. भूक नाही मला खूप. |
| **वेटर** | : | साहेब, काय आणू? ट्यूबलाईट, का लाईट |

**दोन मित्रांचा संवाद**

| | | |
|---|---|---|
| **पहिला मित्र** | : | चल आपण बुद्धिबळ खेळू. |
| **दुसरा मित्र** | : | तू पुढे हो, मी स्पोर्टशूज घालून येतो. |

CN4BSG

**ओळखा पाहू!**

बत्तीस भाऊ, एकच बहीण,
सर्वांत तीच आयुष्यमान.

चार बोटांचे अंतर दोघांत असे,
एकावर विश्वास, तर दुसऱ्यावर नसे.

बारा घरांवर तिघे पहारा करती,
सदैव फिरती, न थकती, न थांबती.

- **वाचा.**


एकदा एक हुशार माणूस दरबारात आला. त्याला अनेक भाषा येत होत्या. तो प्रत्येक भाषा सफाईदारपणे बोलत होता. शब्दाशब्दांवरून त्याचे भाषेवरचे प्रभुत्व दिसत होते. दरबारातील सगळे लोक अवाक् झाले.

"माझी मातृभाषा ओळखणाऱ्याला मी पाच किलो सोने बक्षीस देईन," असे त्याने आव्हान दिले. याची मातृभाषा कशी ओळखायची? प्रधानाला प्रश्न पडला. त्यांनी त्याच्याकडे रोखून पाहिले. नंतर ते हसत म्हणाले, "तुमची मातृभाषा आम्ही जरुर ओळखू; परंतु आता तुम्ही राजदरबाराचा पाहुणचार घ्या. थोडी विश्रांती घ्या. त्यानंतर आपण तुमच्या मातृभाषेबद्दल बोलू."

तो बहुभाषिक, हुशार माणूस दरबारातील शाही जेवण करून विश्रांतीसाठी अतिथी कक्षात गेला व गाढ झोपला. तो झोपलेला पाहून प्रधानांनी एका सेवकाकडून बादलीभर पाणी मागवून घेतले व त्यावर ओतले. 'सू छे, सू छे' म्हणत तो दचकून उठला. समोर प्रधानजींना पाहून मनोमन खजील झाला. प्रधानजी गालातल्या गालात हसत म्हणाले, "तुमची मातृभाषा गुजराती आहे!" प्रधानांनी मातृभाषा नेमकी ओळखली होती.

आनंद, दुःख, आश्चर्य, भीती आदी प्रसंगी सहज निघणाऱ्या उद्गारावरून माणसाची मातृभाषा कळू शकते.

- खालील आकृतीत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांची उदाहरणे दिली आहेत. आकृतीतील शब्दांचा उपयोग करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.




उदा., १. मंदार गुणी आहे.

२. तो पिवळा चेंडू खेळतो.

३. मंदारला मिठाई आवडते.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे–४११००४.

मराठी सुगमभारती इ. ६ वी

₹ २७.००